# १०. बरकत

– साहिल शेख

साहिल बाबासाहेब शेख (जन्म १९७८)

नव्या पिढीतील लेखक. मुक्तशैली हे साहिल यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य. 'कोलाज आणि काही कविता' हा कविता संग्रह. 'फार्मलेस' हा कथासंग्रह. 'सविनय अस्वस्थ' हा स्फूटलेख संग्रह. मराठीतील महत्त्वपूर्ण नियतकालिकातून लेखन प्रकाशित. मुस्लीम मराठी साहित्यप्रकारात लेखन करणाऱ्या नव्या पिढीतील एक संवेदनशील लेखक म्हणून ओळख.

'बरकत' ही भारतीय गरीब मुस्लीम कुटुंबाचे चित्रण करणारी कथा आहे. कथेतील रियाज-फातिमाचे कुटुंब कष्ट करून जगणारे आहे. जात-धर्मविषयक मानसिकतेपासून दूर आहेत. पण गावातील जातीय दंगलीत त्यांचे दुकान जाळले जाते. तेव्हा रियाज मनामनातून हादरून जातो. रियाजचे दुकान कोणी जाळले यासंबंधीच्या शक्यता कथाकार वाचकावर सोडून देतो. ही कथा वाचकाला विचार प्रवृत्त करणारी आहे.

फातिमाचं लगीन झालं, नव्हे उरकलंच... जेमतेम उर्दू दहावी शिकून पडद्यात राहणारी फतिमा... आपल्या आसपासच्या कोणत्याही मुलीसारखीच पण पाच वक्त नमाजच्या पाबंदीची... गल्लीतल्या साऱ्यांनी भांडीकुंडी, रोख रक्कम जमेल तशी केली धडपड... मुलगा चांगला...रियाज नाव त्याचं ... कुठल्यातरी एम. आय.डी.सीत फॉन्ड्रीत काम करत करत आता कुठं जम बसलाय म्हणे... स्वतःचं घर आहे छोटंसं... आई-वडील... आता फातिमा. बस्स्. छोटा संसार... सुखी संसार. पण फातिमा उजवी दिसायला त्याच्यापेक्षा, फातिमाच्या आईला नकारच कळवायचा होता. पण...

दादी म्हणाली, 'हमारे मे कहाँ मिलतैयं नोकरीके बच्चे? गल्लीमेका हुशार अस्लम फिरतयच नव्हे नेत्यांकी हमाली करते, बोंब मारते...'

या हट्टापुढं साऱ्यांनी माघार घेतली आणि फातिमाचं एकदाच आवरलं...

फातिमाच्या घरचा व्यवसाय फुलांचा, म्हणजे यांना फुलवालेच म्हणतात,

'फुलवाली भाभी' सगळीकडे प्रसिद्ध...गावातल्या कुठल्याही देवाला यांच्या फुलांशिवाय पुजा शोभतच नाही. पहाटेची नमाज पढून झाली. भाभी-फातिमा दोघी छोटे हार आणि फुलं ओवीत, माळत बसायच्या आणि गावातल्या जवळपास प्रत्येक दुकानात गौस, फातिमाचा अब्बा ते द्यायला जायचा... सकाळी आठनंतर मग यांची आवराआवर... स्वयंपाकपाणी... यांच्या घरावरून जाताना केवळ विविध फुलांचा मोहक सुवासिक दरवळच... फुलांना माळणारे, हार-गजरा, तुरे सजावटीत रमणाऱ्या फातिमाच्या नाजूक हाता-बोटांवर मेंदी भरली आणि झेंडूच्या फुलांसारखा गडद हळदी रंग खेळून फातिमाचा निकाह झाला.

बावरणाऱ्या नववधूचे नवे-नवे हळद ओले स्वप्नांचे दिवस भुर्रकन उडून गेले... वर्षभरात नवीन फुल जन्माला आलं...



Scanned with OKEN Scanner

"छोरीच हुई, क्या नशिबा हाई, क्या मालूम...? हमारे हात का निम्मकचं खोटा..."

दादी तेव्हाही बडबडलीच... आणि शुक्रीया अदा करायला नमाजला बसली. पांढरा सलवार कमीज, पांढरेच केस, पांढरी गच्च बांधलेली ओढणी आणि सुरकुत्यातून लुकलुकत हलणारे मोतीबिंदूचे डोळे... पण सुई आणि दोऱ्याची जादू करावी ती तिच्याच बोटांनी...

रियाजनं फॉन्ड्रीतलं काम सोडलं... कुठल्यातरी सामाजिक संघटनेच्या मदतीनं आता दुकान थाटलं होतं... एवन मटण शॉप... चिकनचा धंदा तेजीत होता...हफ्ते फिटत होते... घरगाडा जरा सुखानं चालला... पण...

अचानक काय झालं कळलंच नाही कुणाला... गावातली सगळी दुकाने पटापट बंद होत आली... प्रचंड मोठी रॅली निघाली, फुर्रर्र असा दुचाक्यांचा आवाज करीत... दटावणी, सूचना, विनंती-धमकी पन्नास एक तिब्बलशीट गाड्या गावभर उंडारत होत्या... हातात काठ्या, चेनं... हॉटेल, दुकान, पानपट्ट्या, छोटा चौक सगळं चिडीचूप... कर्फ्यू लागल्यासारखं... आपला खोका बंद करून रियाज निघाला... बरं झालं आज जरा टिव्हीवर क्रिकेटची मॅच बघता येईल... छोट्या यास्मिनबरोबर थोडं खेळता येईल... आलेली खुरटी दाढी खाजवत हा घरी निघालाच होता की... दुसऱ्या कोपऱ्यातून आणखी एक जमाव आला. अरे हे तर आपल्या आसपासच्या वस्तीतले... हा मणेर, मोमीन, अत्तार, पिंजारी, सुतार, जमादार... हे कुठं पळताहेत... त्यातही त्यानं रमज्याला विचारलं... 'क्या हुआ... कहाँ चलै... गाव की बंद करेई...' 'तु सच्चा मुसलमान अच्छीगा तो हमारे साथ आईगा... नै तो जा यहाँसे...' रियाजला अशा वातावरणाची सवय होती... ईदगाहच्या वेळी आणि त्यापूर्वी लहान असताना बाबरीच्या वेळी... पण त्याने कसलीच प्रतिक्रिया न देता पुढे चालणे पसंद केलं.

रस्त्यावरचे व्यवहार तुरळक, गर्दी पांगली, सगळं भयाण शांततेत... घरी गेला...
'क्या हुअे जी बाहर, दुकाना की बंद है' फातिमा...
'न्हंदे छोड... इनको कामा नै, औरं क्या जात-पात के झगडे... कहाँ का गुस्सा कहाँ तो निकालतैं ...'

आई मुलीला घेऊन खेळत बसलेली... बाबा चूपचाप कॉटवर पडलेले... रियाज शिकून खूप मोठा होईल अशी स्वप्ननक्षी रेखाटणारे... वस्त्रांवरील नक्षीकामात यांचा नाद कुणीच करत नव्हता. हातमाग-यंत्रमाग-ऑटोलूम अशा प्रगतीत हे मात्र कामगारच राहिले... आता पॅरालीसीस आणि विड्या फुंकून झालेल्या छातीचा पिंजरा...
'तू कहाँ भार जाऊ नको आणि फोन बंद कर कू गप्प बैढ' आई म्हणाली... 'कोन बुलाने आए तो तुमे भारच हाई करकू बोलतीव"... फातिमानंही फर्मान सोडलं...
छोट्या सोफ्यातं जुनाट टिव्ही सुरू करून तो बसला... बाहेरच्या गैरसमजाच्या, अंधधर्मांध माणूस म्हणून जगणं हराम करणाऱ्या कोलाहलापासून दूर.. चॅनल बदलतं... पण का कुणास ठाऊक त्याच्या मनात ही धाकधूक चालूच होती.जोहरच्या नमाजपर्यंत सगळं शांत... जेवणं झालीत... बाहेरची काही खबरबात नाही... दरवाजे उघडे असले तरी सख्या शेजाऱ्यांची मनाची कवाडे बोलती मात्र बंद...



Scanned with OKEN Scanner

फातिमा त्याला म्हणाली होती... फुलांचं मार्केट विचारून या, 'बचतगट मे शी पैशे काडींगे, और फुल का धंदा करतू में...'

'बाद मे देखींगे, अल्ला अच्छी रोजी-रोटी दे रहे...' त्याचं उत्तर...

अल्लाहच्या मर्जीनं हलालकमाई खातोय, याचं फक्र वाटतं आणि हा जमेल तेवढी फर्ज अदा करत व्यवसाय करतो... गावापासून दूर छोट्या वस्तीतलं छोटं घर... लाईट गेली अचानक... आणि मग सगळे शांतपणे डोळे मिटून पडले... यास्मिनला जवळ कुशीत घेऊन तिला गोंजारत रियाजने झोप काढली... उशिराच उठला तसा.. असरच्या पूर्वी... पाच वाजायला आले होते... फातिमाच्या हातचा चहा घेऊन दुकान उघडायला निघाला... गाव खेळत होतं खेळीमेळीत रोजच्यासारखं... वाटेवर असताना 'अजान'झाली... मधल्या मशिदीत गेला. असरच्या रकाती पढून उठला... मशिदीतून बाहेर पडलेल्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर सुन्न खामोशी का आहे.. ? हे काही उमजेना...

आसपासच्या इतर दुकानांप्रमाणे त्यानंही दुकान उघडले... जाळीदार पत्र्यातून कोंबडी काढली... याचं काम सुरू झालं... 'बिस्मिल्लह' करत दोन-चार गिऱ्हाईक झाले, किलो अर्धा किलो करत सांज मावळली. रोजच्या सरासरीपेक्षा आज अर्धापाऊण किलो चिकन जास्त उरलंय... लवकर घरी जाऊन देवूया... ईशा, रात्री साडे आठपर्यंत... आज नमाज चुकवून घरी गेला... फातिमानं स्वच्छ केलेलं चिकन शिजवायला ठेवलं...

दोन वर्षाभरापूर्वीचे दिवस आठवत मियाँ-बिवी झोपले... उद्या परवा बँकेचा हफ्ता भरायचा आहे... काऊन्टर आणि शटरची उधारी फेडायची आहे...झोप लागली..

झोपेचं सोंग घेऊन झोपणाऱ्यांच्या गावात, फातिमाचं कुटुंब गाढ झोपलेले... यास्मिन रियाजजवळ... दार ठोठावलं कुणीतरी... धाड, धाड, धाड... दचकून रियाज उठला... लुंगी सरळ आवळली... बाहेरचा बल्ब पेटवून... गडबडीनं दार उघडलं... 'सलामअलैकुम', 'यत्ते रात को भी क्या सलीम भै ?' रियाज

बाहेर शटरवाला सलीम उभा होता...

'कुछ तो बोलो तो... हूँ की ?'

सलीमने काहीच न बोलता... रियाजचा हात धरला...दोघे पळत सुटले. दोघं रस्त्यावर मग दुकानाच्या दिशेने... दुकान... उचकटलेलं शटर... मग फळ्यांची मोडतोड... दोनचार पेटवलेल्या टायर्स... दुकानात आग.. जाळ...काळीकुट्ट राख... अंगार... विस्तू तेवढा फुललेला...

'या अल्लाह,...' एवढा एकच शब्द रियाजच्या तोंडून... आणि हळूहळू माणसांची वाढत जाणारी गर्दी...

रियाजला धीर देणारा, सलूनवाला तात्या, युसूफच्या पानशॉपची मोडतोड झालेलीच, तरीही तो इथेच ! लिंबू, कोथींबीर, खोबऱ्याची गाडी लावणारा सत्या भुई, बांगडे-मासे विकणारी कोळीण मावशी मनातून हळहळत...

रियाजच्या बाजूनं जमलेली... विविधतेने एकता जपणारी माणसं, कुणीतरी नेता, नगरसेवक फोनाफोनीत मग्न...

इकडं फातिमा उठलेली...

'कहाँ गए...क्या मालूम... जल्दीच गईं नमाजको' म्हणत आंघोळ उरकून...



Scanned with OKEN Scanner

चहा टाकला...

पहाटे अजानचा सूर आणि उकळणारा चहा... लगबगीनं म्हातारीला चहा देऊन... फातिमा नमाज पढू लागली...

दुवा मागू लागली...

'या अल्लहा मेरे शौहर की हिफाजत फर्मा,... हमारे रोजी-रोटी मे बरकत अता फर्मा...'

(फार्मलेस')

★ ★ ★

Scanned with OKEN Scanner